# तें हें माझी माया तरलें

(श्रीमद् गीता–ज्ञानेश्वरी प्रवचने)

**भाग पहिला**

**ह. भ. प. दिनकर**

**तथा**

**श्री. दिनकर रंगराव महाडीक**

(ब्रह्मीय दीक्षाप्राप्त भक्तियोगी)

शुभ्रा पब्लिशिंग हाउस
इस्लामपूर

**शुभ्रा पब्लिशिंग हाऊस**

'मनोकामना' शिवनगर, इस्लामपूर,

ता. वाळवा, जि. सांगली.

मोबा : ८१७७९९२६९३, ८२०८०३३७६८

● ते हे माझी माया तरले – ह.भ.प. दिनकर तथा
श्री. दिनकर रंगराव महाडीक

● वाङ्मय प्रकार / आध्यात्मिक

● शुभ्रा पब्लिशिंग हाऊस
सौ. दिपाली सचिन हांडे
'मनोकामना' शिवनगर, इस्लामपूर.
ता. वाळवा, जि. सांगली.
मो. ८१७७९९२६९३, ८२०८०३३७६८



● © ह. भ. प. दिनकर तथा श्री. दिनकर रंगराव महाडीक


पत्ता : 'रंगरावस्वामी', मु. पो. इटकरे, ता. वाळवा, जि. सांगली,
पिन ४१५४०३, मोबाईल : ९६६५३०६३५९
G-Mail - drmahadik09@gmail.com



● मुखपृष्ठ :

● अक्षर जुळणी :
अक्षर टाईपसेटर्स, कोल्हापूर.

● प्रथमावृत्ती :

● मुद्रण स्थळ :

● किंमत /– रुपये


**सूचना :** सदर पुस्तकातील मजकुराशी प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.





## अर्पणपत्रिका...!

दिव्य आध्यात्मिक ज्ञानाचा मूळ स्रोत,
श्रीहरीभक्त परायण, महान भक्तियोगी,
परमपूज्य स्वामी महाराज ब्रह्मीभूत
**रंगराव राऊसो महाडीक** (१९२४–१९९५)
यांच्या पवित्र स्मृतीस वंदन करून
हा प्रवचनांचा पहिला भाग त्यांना समर्पित!

**– ह. भ. प. दिनकर**

---

सदर पुस्तक इस्लामपूर, ता. वाळवा. जि. सांगली (महाराष्ट्र)
पिन ४१५४०९ यांचे न्यायालयीन कक्षेत.

॥ ॐ॥

# श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीच्या महतीसंबंधी काही साक्षात्कार

सर्व धर्मियांचे ऐक्य देवस्थान, परमेश्वरस्वरूप श्री दावल मलिकनाथ महाराज, शिवपुरी, ता. वाळवा, जि. सांगलीचे परम भक्त बंडूमामा तथा श्री आकाराम हरी बारपटे (१८९७-१९९७) यांनी देह ठेवल्यानंतर दोन-तीन महिन्यांनी मला तुर्यावस्थेत जो प्रचंड साक्षात्कार दिला त्यात त्यांनी श्रीमद्-गीता ज्ञानेश्वरीचा उल्लेख केला.

त्यांच्या अखेरच्या आजारपणात शिवपुरी येथे, एका घरात श्री बंडूमामांना मी । भक्ती श्रीहरी प्राप्ती मुक्ती। ग्रंथाचे हस्तलिखित वाचून दाखवित होतो. त्यांनी ग्रंथातील काही भाग ऐकला. थोड्या वेळाने मला त्यांनी थांबायला सांगितले. प्रकृति अस्वास्थामुळे त्यांना त्रास होत होता. मी त्यांचा निरोप घेतला.

तोच त्यांचा अखेरच निरोप ठरला. १२ जून १९९७ रोजी त्यांनी देह ठेवला. श्री दावल मलिकनाथ शिखराच्या पश्चिमेस खालच्या बाजूस अंत्यसंस्कार केले. शिखरावर श्री दावल मलिकनाथांच्या मागील बाजूस, दक्षिणेकडे तीस एक फूटावर त्यांची समाधी बांधण्यात आली.

त्यानंतर दोन तीन महिन्यांनी मला तुर्यावस्थेत एक प्रचंड साक्षात्कार मिळाला. कै. श्री आकाराम हरी बारपटे तथा बंडूमामा मला म्हणाले, ''त्या दिवशीची ती कागदे आता तू घेऊन ये. नाहीतर असे कर की श्री ज्ञानेश्वरीच घेऊन ये!'' जय श्रीहरी! परमभक्त बंडूमामांनी मरणोपरान्त तीन महिन्यांनी मला दिलेल्या साक्षात्कारात श्रीमद् ज्ञानेश्वरीचा उल्लेख केला. त्यादिवशीची ती कागदे म्हणजे माझ्या श्री भक्ती श्रीहरीप्राप्ती मुक्तीचे हस्तलिखित होय. पुढे यथाकाळ श्री. बंडूमामांच्या समाधीपाशी बसूनच



श्रीमद्-गीता ज्ञानेश्वरीच्या काही भागाचे मी वाचन केले. तसेच श्री भक्ती श्रीहरीप्राप्तीमुक्ती ग्रंथाचे वाचनही श्री दावल मलिक शिखरी केले.

दुसरा साक्षात्कार आहे तो म्हणजे माझे गुरुवर्य डॉ. प्रा. वि. रा. तोडकर सर यांच्या संदर्भातील. आम्ही दोघे गुरूशिष्य परमेश्वरस्वरूप श्री. दावलमलिकनाथ दर्शनार्थ शिखरी गेलो असता श्री. तोडकरसरांनी एका आध्यात्मिक कादंबरी लेखनाविषयीचा मनोदय नाथांच्या समोर उपस्थित करून 'असे लेखन करावे का?' असा प्रश्न विचारला. परमेश्वरस्वरूप श्री दावल मलिकनाथ महाराजांच्याकडून उत्तर आले. ''श्रीमद् गीता-ज्ञानेश्वरीवर काही लिहा!'' मा. सरांनी आपला मनोदय बदलून 'सहज प्रकाश' नावाच्या थिऑसॉफिकल सोसायटीने प्रकाशित केलेल्या पुस्तकात श्री ज्ञानेश्वरी संदर्भात लिहिले आहे.

परमपूज्य रंगरावस्वामी महाराजांना जे साक्षात्कार ज्ञानेश्वरी संदर्भात मिळाले त्यामुळे त्यांचे जीवन ज्ञानेश्वरीमयच होऊन गेले होते, हे आपण जाणताच. त्यांच्या समाधीस्त होण्यानंतर मला जे साक्षात्कार श्रीमद् गीता-ज्ञानेश्वरी संदर्भात मिळाले, त्यामुळे माझेही जीवन ज्ञानेश्वरीमय होऊन गेले, हे आपण प्रत्यक्ष पाहतच आहात. माझ्या 'श्री भक्ती श्रीहरीप्राप्ती मुक्ती' ग्रंथात दहाव्या अध्यायात तीन खास ओव्यात मी श्रीमद् ज्ञानेश्वरीची महती गायिली आहे. प्रवचन रूपाने ती आपल्यापुढे आहेच.

हे पान येथे लिहिण्याचे कारण म्हणजे देव, देवता, समाधीस्त संत-महात्मे, भक्त यांना तसेच अदृश्य जडदेहरहीत जगतातून, म्हणजेच भूवर्लोक, स्वर्गलोकादि लोकांतून श्रीमद् गीता-ज्ञानेश्वरीबद्दल नितान्त आदर आहे, त्याच्या प्रत्यक्ष अनुभूतीचे हे प्रगटीकरण.

**- ह. भ. प. दिनकर तथा**
**श्री. दिनकर रंगराव महाडीक**

इटकरे,
योगिनी एकादशी,
ज्येष्ठ कृ. ११, श्री शके १९४३
प्लव नाम संवत्सर
सोमवार, दि. ५ जुलै २०२१

ooo

# निवेदन...

'ते हे माझी माया तरले' हा माझा श्रीमद् गीता ज्ञानेश्वरीवरील सात प्रवचनांचा सर्वांगसुंदर असा पहिला भाग आहे. ही प्रवचने श्रीमद् गीता ज्ञानेश्वरी पारायण सामुदायिक सप्ताह सोहळ्यात वेळोवेळी, निरनिराळ्या गावी देण्यात आली आहेत.

एखाद्या गावच्या भक्त-मंडळींनी, माझी मान्यता घेऊन, पारायण सप्ताहात माझे प्रवचन आयोजित केले की मी ज्या श्लोक-ओवींवर प्रवचन देण्याचे निश्चित करीन, त्यावर ध्यान लावून परब्रह्माकडून प्रथम मंजुरी घेत असे. त्यानंतर त्याचे प्राथमिक लेखन करीत असे. दोन-तीन दिवस हे ब्राह्म-मुहूर्तावर माझ्या परमात्म्याच्या नित्य पूजनानंतर करीत असे. ज्या दिवशी ते प्रवचन द्यायचे, त्याच दिवशी त्याचे लेखन सकाळीच पूर्ण झालेले असायचे. ध्यानयोगाद्वारे परमात्म्याकडून त्यांची अंतिम मंजुरी घेत असे. त्यावर त्याच दिवशी दिनांकांकित सही करीत असे. मग सायंकाळी नियोजित वेळेवर ते प्रवचन, मंजुरीचे कागद बरोबर न नेताच देत असे व ते भक्तजनांना अतिशय आवडत असे. प्रथम कागदावर लिखाण केल्याने कोठे काय बोललो, हे लिखित स्वरूपात राहत असे. त्यानंतर ते कागद फाईल केले जात असत. अशा रीतीने दिलेली प्रवचने संग्रहित होत गेली.

'श्री भक्ती श्रीहरीप्राप्ती मुक्ती' या माझ्या अलौकिक महाकाव्य रूपी भक्तिग्रंथाच्या प्रकाशनानंतर, श्रीमद्-गीता ज्ञानेश्वरीवरील माझ्या



निवडक प्रवचनांचा संग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय होता. पण काही ना काही कारण घडून तो लांबणीवर पडत गेला. प्रवचनांचे पुनर्लेखन लांबणीवर पडत गेले.

सर्व धर्मियांचे ऐक्य देवस्थान कृपावंत देवराया, परमेश्वरस्वरूप श्री दावल मलिकनाथ महाराज, शिवपुरी, ता. वाळवा, जि. सांगली यांचेकडून गुप्त संदेशाद्वारे प्रवचनांचे पुनर्लेखन करण्याविषी वरचेवर सूचना आल्या. ही प्रवचने पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून भक्तजनांच्या आत्मोद्धारासाठी उपलब्ध करून द्यावीत असेही सांगण्यात आले.

श्री दावलमलिकनाथांच्या आदेशानंतर प्रवचनांचे पुनर्लेखन सुरू झाले. पुनर्लेखनात कुठे एखाद-दुसरा शब्द- वाक्य दुरुस्त करावे लागले. ते नगण्य होते. पुनर्लिखित प्रवचनांचा, की ज्यात सात प्रवचने संग्रहीत आहेत, हा पहिला भाग होय.

तसे हे सारे परमेश्वराचेच आहे. त्यांच्या अविरत भक्तीमुळे त्यांनी 'माझे' म्हणण्याचे वरदान मला दिले आहे एवढेच. सर्वधर्मिय संत-महात्म्यांनी त्यांचे वाङ्मय माझ्या प्रवचन सेवेसाठी उपयोगात आणण्याचा अधिकार मला बहाल केला, अर्थात गुप्तरुपाने, त्याबद्दल ह. भ. प. दिनकर त्यांच्या चरणावर नतमस्तक आहे.

हा सर्वांगसुंदर प्रवचन संग्रह असे मी म्हणत आहे खरे, परंतु न्यून राहिल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याबद्दल भक्तजन-संतमंडळींनी मला माफ करावे, ही विनंती.

तशी माझी काहीच योग्यता नसताना केवळ सद्गुरूकृपेमुळे, श्रीहरी परमेश्वराचाच प्रतिनिधी मानून अनेक गावच्या भक्त-संत सज्जन मंडळींनी मला श्रद्धा-आदर देवून वर्षानुवर्षे मी जे बोललो ते शांतपणे ऐकले, त्याबद्दल त्यांना शतश: धन्यवाद, त्यांना वंदन! हजारो भक्तमंडळींशी संपर्क. त्यामुळे कोणाचा म्हणून नामोल्लेख येथे करायचा? म्हणून सर्वांचे आभार!

परमेश्वरी कृपाप्रसादाचा हा अमृतमय, सात प्रवचनांचा (हा पहिला

भाग) ठेवा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करून आत्मोद्धाराच्या मार्गावर वाटचाल करीत असलेल्या भक्तांना उपलब्ध करून देत आहोत. परमेश्वर आपणास इहपरलोकी सहाय्यकारी व्होवोत अशी प्रार्थना करतो!

।। जय जय रामकृष्णहरी।।

इटकरे,
योगिनी एकादशी,
ज्येष्ठ कृ. ११, श्री शके १९४३
प्लव नाम संवत्सर
सोमवार, दि. ५ जुलै २०२१

**– ह. भ. प. दिनकर तथा**
**श्री. दिनकर रंगराव महाडीक**
**मोबा. ९६६५३०६३५९**

❍❍❍



# नमन श्लोक व ध्यानम्

**ॐ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ।**
**निर्विघ्नं कुरू मे देव सर्व कार्येषु सर्वदा।।**

**गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णू गुरूर्देवो महेश्वरः।**
**गुरू साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरूवे नमः।।**

**सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके।**
**शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते।।**

ॐ पार्थाय प्रतिबोधिता भगवता नारायणेन स्वयं।
व्यासे न ग्रंथिता पुराण मुनिनामध्ये महाभारतम्।
अद्वैतामृतवर्षिणी भगवतीमष्टादशाध्यायिनीम ।।१।।

नमोस्तुते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्र।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः।।२।।

प्रपन्न पारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये।
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः।।३।।

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृत महत।।४।।

वसुदेव सुतं देवं कंसचाणूरमर्दनम्।
देवकी परमानंदम् कृष्णं वंदे जगद्गुरूम।।५।।

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनिलोत्पला।
शल्यग्राहवती कृपेण वहनी फर्णेन बेलाकुला।
अश्वत्थामविकर्ण घोरमकरा दुर्योधनावर्तिनी।
सोत्तीर्णाखलु पांडवै रणनदी कैवर्तकः केशवः।।६।।

पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थ गंधोत्कटम्।

नानाख्यानककेसरं हरिकथा संबोधनाबोधितम्।
लोके सज्जन षटपदैरहरहः पेपीयमानं मुदा।
भूयादभारतपंकजं कलिएमलः प्रध्वंसि नः श्रेयसे:।।७।।

मूकं करोति वाचालं पंङःगु लघयते गिरीम्
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम्।।८।।

यं ब्रह्मा वरुणेंद्ररूद्रमरूतः स्तुन्वन्तिदिव्यैः स्तवैः-
वेदिः साङ्गः पदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः।
ध्यानावस्थिततदगतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो।
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः।।

❍❍❍



# - अनुक्रमणिका -


| अ.क्र. | प्रवचनाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १) | ते हे माझी माया तरले | १३ |
| २) | उर्ध्व गच्छन्ति सत्वस्था | ३८ |
| ३) | श्रीराम तो मी | ६४ |
| ४) | काम एष क्रोध एष | ८३ |
| ५) | तैसा हृदयामध्ये मी रामु | ११० |
| ६) | तो आधी जरी दुराचारी | १३० |
| ७) | संभावितपणाचे वोझे जया | १५३ |